# समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८ मुंबई.

## सशस्त्र पोलीस शिपाई भरती-२०२१

## लेखी परिक्षेच्या परिक्षा केंद्रामध्ये अंश:त बदल बाबत.

## प्रेसनोट

सशस्त्र पोलीस शिपाई भरती -२०२१ शारीरिक चाचणीमधील २५६२ उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र झाले आहेत.या उमेदवारांची लेखी परीक्षा **दिनांक २३/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा.छाती क्रमांक ८७ ते छाती क्रमांक १२३२८ पर्यंत १५३६ उमेदवार यांची बैठक व्यवस्था** रॉयल गोल्ड स्टुडियो, रॉयल पाम, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400065 **(Royal Gold Studio, Royal Palm, Goregaon (East) Mumbai 400065)**या ठिकाणी घेण्यात येणार आहे.परिक्षा केंद्रावर येण्याकरीता गोरेगाव रेल्वे स्टेशन येथून बस क्र.४५२ स्टॉपचे नाव **मयुर नगर बस स्टॉप** आहे.

तसेच **छाती क्रमांक १२३२९ ते छाती क्रमांक १८१३७ पर्यंत**१०२६ उमेदवार यांची बैठक व्यवस्था MUMBAI EXHIBITION CENTER, NESCO, HALL NO.०५ GOREGAON EAST MUMBAI. परिक्षा केंद्रावर येण्याकरीता जवळील रेल्वे स्टेशन राम मंदीर पुर्व.

सदर लेखी परीक्षेस पात्र उमेदवारांनी दिनांक २३/०७/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वाजेपर्यंत उपरोक्त नमुद ०२ परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे. परीक्षा सकाळी ११.०० वा.सुरू होईल. उशिरा येणाऱ्या उमेदवारांना परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

सदर लेखी परीक्षेसाठी येताना उमेदवार यांनी महाआयटी यांनी ई-मेलव्दारे पुरविलेले शारीरिक चाचणी व **लेखी परीक्षेचे ओळखपत्र डाऊनलोड करुन त्याची कलर प्रिंट आणि आवेदन अर्जावरील दोन कलर पासपोर्ट साईज फोटो तसेच या कार्यालयाकडुन मैदानी चाचणी करीता पुरविण्यात आलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.**परीक्षा केंद्रावर उमेदवारांना मोबाईल फोन, डिजीटल घडयाळ,इलेक्ट्रॉनिक वस्तु किंवा इतर तत्सम वस्तू तसेच शक्यतो कोणत्याही प्रकारच्या बॅगा आणु नये. जर उमेदवारांनी बॅगा आणल्यास त्या परीक्षा केंद्राच्या बाहेर स्वत:च्या जबाबदारीवर ठेवण्यात याव्यात. सदरच्या बॅगा व त्यातील मौल्यवान व इतर वस्तु गहाळ / चोरीस गेल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच परीक्षा केंद्रावर उमेदवांराना प्रश्नपत्रिका,उत्तरपत्रिका, काळा पेन, तसेच पॅड बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी पुरविण्यात येणार आहे.याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदरची लेखी परीक्षा नि:पक्षपातीपणे व पारदर्शकपणे पार पाडण्यात येणार आहे. उमेदवारांनी कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करु नये.तसेच सदरची बाब निदर्शनास आल्यास तात्काळ भरती प्रमुखांशी संपर्क साधावा.

(प्रणय अशोक) भापोसे,
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.८, मुंबई.

दुरध्वनी क्र. ०२२– २६८५६५४२
फॅक्स क्र. ०२२ – २६८५६१२०
cmdt.srpf8.mumbai@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन,
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल,
गट क्र.८, मुंबई–४०००६५

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. रारापोबल/गट–८/आशा/प्रलि/पो.भ.–२०२१/१३४६/२०२३, मुंबई, दि.२०/०७/२०२३

प्रति,
मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क संचालनालय अधिकारी,
महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत,
मंत्रालय समोर, मुंबई.

**विषय** :– सशस्त्र पोलीस शिपाई भरती–२०२१ च्या लेखीपरिक्षेसाठी उमेदवारांच्या परिक्षाकेंद्रामध्ये अंश:त बदल बाबत प्रेस नोट प्रसिध्द करणेबाबत.

–––०००–––

उपरोक्त संदर्भाधीन व विषयांस अनुसरून सादर करण्यात येते की, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ८, मुंबई यांचे आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई भरती प्रक्रियेमधील लेखी परिक्षा दिनांक २३/०७/२२३ रोजी आयोजित करण्यात आली आहे. सदर लेखी परीक्षेतील पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेचा दिनांक, वेळ व ठिकाण (पत्ता) याबाबतची माहिती देणे आवश्यक असल्याने प्रेसनोटची मुळप्रत सोबत पाठविण्यात आली आहे. सदरची प्रेस नोट व सुचना दिनांक २१/०७/२२३ रोजी आपल्या विविध प्रसार माध्यमाद्वारे प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

सोबत– प्रेसनोट मुळप्रत जोडली आहे.

(प्रणय अशोक) भापोसे,
समादेशक, (अति.कार्य.)
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ८, मुंबई.

प्रत सविनय सादर ,
मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा.अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे.